महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र. मआ/शाआजा/ज/१००७८
दि. ०५/०९/२०२४

# कार्यालयीन परिपत्रक

ज्या प्रकरणामध्ये लेआऊट, बांधकाम विकसन परवानगी मान्य आहे व सदर बांधकाम नकाशामधील आरक्षणाचे जागेचा TDR जनरेशन प्रस्ताव दाखल झाला असल्यास त्याचा अंमल रेकॉर्डकरिता लेआऊट, बांधकाम नकाशावर घेऊन मान्य रेकॉर्ड प्लॅनची साक्षांकित प्रत टीडीआर प्रस्तावा मध्ये व बांधकाम विकसन प्रस्तावा मध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे. त्या करिता टीडीआर जनरेशन विभाग व बांधकाम विकास विभागाने खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१) टीडीआर कार्यप्रणालीनुसार टीडीआर जनरेशन प्रस्ताव बांधकाम विकास विभागाकडे प्राप्त झालेनंतर संदर्भांकित कार्यप्रणालीनुसार FSI बाबत अभिप्राय नोंदविणेपूर्वी मिळकतीवरील वेळोवेळी सर्व मान्य लेआऊट बांधकाम परवानगी नकाशाचे अवलोकन करून टीडीआर प्रस्तावित मिळकतीचा यापूर्वी FSI वापरला नसल्याची अथवा FSI प्रस्तावित नसल्याची खातरजमा कटाक्षाने करणे आवश्यक आहे.

२) बांधकाम विकास विभागाकडे टीडीआर जनरेशन प्रस्तावाची आगाऊ प्रत (advance copy) प्राप्त झालेनंतर टीडीआर प्रस्तावित आरक्षण क्षेत्राचे चटई क्षेत्र लेआऊट, बांधकाम नकाशांमध्ये मान्य करण्यात येऊ नये.

३) बांधकाम विकास विभागाकडे टीडीआर जनरेशन कडून टीडीआर प्रकरणाची आगाऊ प्रत (advance copy) पाठविले जाते. सदरची प्रत प्राप्त झालेनंतर प्रस्तावित टीडीआर मिळकत ही मान्य लेआऊट/बांधकाम परवानगी मधील असल्यास बांधकाम प्रस्ताव मध्ये वापरलेला चटई क्षेत्र व प्रस्तावित टीडीआर क्षेत्र नकाशामध्ये दर्शवून आरक्षणाचे Potential निरस्त करणे आवश्यक आहे. जेणेकरुण भविष्यकाळामध्ये आरक्षणक्षेत्राचा दुबार मोबदला दिला जावू नये.

४) टप्पा क्र. १ चे टीडीआर प्रकरण अभिप्रायाकरिता बांधकाम विकास विभागाकडे येण्यापूर्वी सदरची कार्यवाही पुर्ण करणे व अभिप्रायासोबत दुरुस्त/रेकॉर्ड नकाशाची प्रत समाविष्ट करणे.

डॉ राजेन्द्र ब भोसले
भाप्रसे
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका